# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping distressed person**

**Police Station** :- **Washim City**

**Date of Good Work done** :- **12/05/2022**

**Brief of the work done :-**

कारमधील 3.76 लाख रुपयांची चोरी झालेली बॅग सापडली.

लोकमत

## गैरसमजातून चोरीची तक्रार; पैशाची बॅग विश्रामगृहातच

**वाशिम** : हिंगोलीवरून कारने वाशिमला आल्यानंतर, कारमधील ३.७६ लाख रुपये लंपास केल्याची तक्रार सुनील जाचक यांनी ८ मे रोजी वाशिम शहर पोलीस ठाण्याला दिली खरी; परंतु त्यानंतर पैशाची बॅग हिंगोली येथील विश्रामगृहातच ठेवल्याचे लक्षात आल्याने १० मे रोजी तक्रारकर्त्याला स्वतःची तक्रार परत घेण्याची वेळ आली.

### पोलिसांची धावपळ

बॅग चोरीला गेल्याची तक्रार प्राप्त झाल्यानंतर शहर पोलिसांनी तपासाची चक्रे फिरविली. शहर परिसरात चोरीचा तपास सुरु असतानाच पैशाची बॅग सापडल्याची माहिती मिळाली. तपासात पोलिसांची धावपळ झाली.

सुनील शहाजी जाचक (वय ३२, रा. सिद्धेश्वर निंबोडी, ता. बारामती, जि. पुणे यांनी ८ मे रोजी वाशिम शहर पोलीस ठाण्याला फिर्याद दिली की, ते हिंगोली येथून वाशिम येथे कारने आले होते. या कारमध्ये ३.७६ लाख रुपये असलेली बॅग होती. दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास वाशिम शहरातील एका रस्त्यालगत कार उभी करून ते चहा पिण्यासाठी हॉटेलमध्ये गेले. परत आल्यानंतर कारच्या पाठीमागील उजव्या बाजूचा काच फुटलेला दिसल्याने त्यांनी बॅग तपासून पाहिली असता, त्यामध्ये पैसे आढळले नाहीत. याप्रकरणी वाशिम शहर पोलीस ठाण्याला फिर्याद दिली. पोलीस अधीक्षक बच्चन सिंह व उपविभागीय पोलीस अधिकारी सुनीलकुमार पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तपास सुरू केला असता, १० मे रोजी फिर्यादीने पैशाची बॅग चोरीला गेली नसून, हिंगोली येथील विश्रामगृहात राहिली होती, असे लेखी बयाण दिली. पैसे चोरीला गेल्याच्या गैरसमजुतीतून तक्रार दिल्याचेही फिर्यादीने बयाणात नमूद केले. गैरसमजुतीतून झालेल्या तक्रारीमुळे पोलिसांची मात्र धावपळ झाली.

Hello Washim
Page No. 1 May 12, 2022
Powered by: erelego.com